**निशाणी क्र. युडब्ल्यू–१**

**<u>शपथेवर उलटतपास प्रथम पक्षकार यांचेतर्फे विधिज्ञ श्री. के. डी. कोष्टी यांचेकडून</u>**

**१२.** माझे मूळ गाव नानेगाव खुर्द ता. पाटण, जि. सातारा हे आहे. माझे शिक्षण इयत्ता आठवी पर्यंत झाले आहे. मला थोडेफार लिहिता–वाचता येते. हे म्हणणे खरे आहे की, प्रथम पक्षकार यांचा यंत्रमाग व्यवसाय असून ते त्याचे प्रोप्रायटर आहेत याबाबतचा कोणताही पुरावा प्रस्तुत कामी दाखल केला नाही. मी सन २०११ पासून प्रथम पक्षकार यांचेकडे कामास होतो हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा मी प्रस्तुत कामी दाखल केलेला नाही. माझी जन्मतारीख ०९/०४/१९६८ अशी आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रथम पक्षकार व माझेमध्ये मालक–नोकर संबंध अस्तित्वात होते हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा मी प्रस्तुत कामी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला दरमहा रुपये ४,०००/– पगार मिळत होता हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा मी प्रस्तुत कामी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे वयोमानानुसार मला आता यंत्रमागावर काम करता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रथम पक्षकार यांनी मला बेकायदेशीरपणे कामावरुन कमी केले हे मी खोटे सांगत आहे. मला कामावरुन कधी कमी केले याची मला तारीख सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, इचलकरंजीमध्ये असलेल्या प्रथेप्रमाणे दिवाळीच्या वेळी कामगारांची सर्व देणी मालक देत असतात. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१३ च्या दिवाळीत माझाही हिशोब मी मालकाकडून घेतला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्याबाबत मी पेमेंट व्हौचर लिहून दिलेले आहे. त्यावेळी काम करत असणा–या दिवाणजीची नावे मी सांगू शकत नाही.

**१३.** मी प्रमोद शिवदास याना ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१३ च्या दिवाळीत मी पेमेंट व्हौचर व राजीनामा लिहून दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, दिवाळीनंतर मला कामावर येता येणार नाही असा निरोप मी प्रमोद शिवदास यांच्याकडून प्रथम पक्षकार यांना दिला होता. हे मला माहित नाही की, प्रमोद शिवदास हे त्यावेळी प्रथम पक्षकार यांच्याकडे दिवाणजी म्हणून काम करत होते. हे म्हणणे खरे नाही की, मला लिहिता येत नसल्यामुळे मी प्रमोद शिवदास यांच्याकडून राजीनामा लिहून

घेवून त्यावर अंगठा करुन प्रथम पक्षकार यांना दिलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी हिशोब घेवून स्वत:हून राजीनामा दिल्याने मला परत कामावर घेण्याचा व मागील हिशोब मागण्याचा हक्क प्राप्त होत नाही.

**१४.** हे म्हणणे खरे आहे की, मी आता सेवानिवृत्तीचे आयुष्य जगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी माझे गावी राहतो व इचलकरंजीमध्ये राहत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे गाव व इचलकरंजीमध्ये १३० ते १४० कि.मी. चे अंतर आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१३ नंतर मी माझ्या गावीच राहत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला कामानिमित्त इंचलकरंजी येथे येणे–जाणे होत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, सरकारी कामगार अधिकारी यांचेसमोर चालू असलेल्या प्रकरणाबाबत माझ्या शपथपत्रात नमूद केलेला मजकूर खोटा व चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१३ नंतर मी दुसरीकडे काम करत होतो. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१३ च्या दिवाळीमध्ये प्रथम पक्षकार यांच्याकडून मी संपूर्ण येणे–देणे हिशोब घेतला असल्यामुळे प्रथम पक्षकार मला काही देणे लागत नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रथम पक्षकार यांच्याकडून जादा पैसे उकळण्याकरिता प्रस्तुतचा खोटा विवाद उपस्थित केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी राजीनामा दिल्यामुळे माझे व प्रथम पक्षकार यांच्यातील नोकर–मालक संबंध त्याचवेळी संपुष्टात आले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील संपूर्ण मजकूर खोटा व चुकीचा आहे.

**उलटतपासणी पूर्ण.**

**फेरतपास नाही.** **श्रवणोत्तर स्वीकृत,**

**सही/–**

कोल्हापूर. (मधुरा आ.मुळीक)

दि.२७/०२/२०२६. पीठासीन अधिकारी,

कामगार न्यायालय क्र.१, कोल्हूपर.